# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)

क्र. 3227 /शि.वि./2014 दि. 24 /09/2014.

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :— अभिवादन स्पर्धा परीक्षा मध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना सहभागी करण्याबाबत.**

**संदर्भ :— सचिव, बानाई, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र. 12.09.2014 च्या पत्रान्वये.**

उपरोक्त विषयाच्या अनुषांगने कळविण्यात येते की, डॉ.बाबासाहेब नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियरर्स, नागपूरतर्फे डॉ. बाबासाहेब आबेंडकरांनी लिहीलेल्या ग्रंथावर आधारीत अभिवादन स्पर्धा परीक्षेचे आयोजन केलेले आहे. त्याकरीता आकर्षक बक्षिसांचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना वैचारीक लखपती बनविण्याचा संस्थेचा मानस आहे. अभिवादन स्पर्धा परीक्षा ही महापरीनिर्वाण दिनी म्हणजे 6 डिसेंबर 2014 ला आयोजित केलेली आहे. यातील पहिला गट इयत्ता 7 ते 12 वी च्या विद्यार्थ्यांचा असून 18 वर्ष वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना यात भाग घेता येईल. 1) जातीभेद निमूर्लन, 2) क्रांती—प्रतिक्रांती, 3)बुध्द आणि कार्ल मार्क्स, 4) अस्पृश्य मुळचे कोण, 5) बुध्द आणि त्यांचा धम्म 6) हिंदू कोड बिल या पुस्तकांवर आधारीत प्रश्नोत्तरे राहतील. उपरोक्त स्पर्धा हि वस्तूनिष्ठ 75% व सविस्तर 25% प्रश्नोत्तरी वा संपूर्ण वस्तूनिष्ठ राहतील. या करीता विद्यार्थ्यांना उपरोक्त पुस्तकांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. सदर परीक्षा ही म.न.पा. शाळेतच घ्यावयाची असून सहभागी शाळांना ढाल शिक्षकांना सन्मान चिन्ह तसेच विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे पारीतोषिक मिळणार आहे

1) प्रथम पुरस्कार (युवक) — 25000/— प्रथम पुरस्कार (युवती) — 25000/—
2) व्दितीय पुरस्कार — 15000/— 3)तृतीय पुरस्कार — 10000/—
4) चतुर्थ पुरस्कार — 5000/— 5) प्रोत्साहनपर 21 पुरस्कार — 2000/— प्रत्येकी

***निबंधस्पर्धा***

दि. 26 नोव्हेंबर 2014 रोजी संविधान दिवसानिमीत्त निबंधस्पर्धा आयोजित केले असून भारतीय संविधान या ग्रंथावर आधारीत चार ते पाच पानांचा 1500 ते 2000 शब्दांचा निबंध लिहावयाचा आहे. पहिला गट इयत्ता 7 ते 12 वी च्या विद्यार्थ्यांचा असून 18 वर्ष वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना यांत सहभाग घेता येईल. करीता खालीलप्रमाणे पुरस्कार मिळणार आहे.

1) प्रथम पुरस्कार — 5000/- 2)व्दितीय पुरस्कार — 3000/- 3) तृतीय पुरस्कार — 2000/-
4)चतुर्थ पुरस्कार — 1500/- 5) पाचवा पुरस्कार — 1000/-

उपरोक्त दोन्ही स्पर्धेत महानगरपालिकेच्या उच्च प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करावयाचे आहे. सदर स्पर्धा हया ऐच्छीक असून इच्छूक विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज किंमत 10/— रू. घेवून शाळांना यात भाग घेता येईल. याकरीता 5 ऑक्टोंबर 2014 पर्यंत संबंधितांना संपर्क साधून शाळेतील विद्यार्थ्यांची माहिती दयावयाची आहे. याकरीता वर उल्लेखित केलेली पुस्तके अल्प किंमतीत बानाई, नागपूर कार्यालयात उपलब्ध असून शाळानिहाय तिथून पुस्तकांची खरेदी करता येईल. सोबत परीक्षेचे विस्तृत माहितीपत्रक सलंग्न आहे त्यानुसार कार्यवाही करावी.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, शाखा नागपूर

द्वारा आयोजित

# अभिवादन प्रश्नोत्तरी व निबंध स्पर्धा

ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखीत सात पुस्तके व भारतीय संविधान या ग्रंथावर आधारीत असेल. या स्पर्धेचे दोन गट राहतील. पहिला गट बाबासाहेबांचे सात पुस्तकावर आधारीत प्रश्नोत्तरी स्पर्धेचा असेल व दुसरा गट भारतीय संविधान या ग्रंथावरील निबंध स्पर्धा राहील. प्रश्नोत्तरी व निबंध स्पर्धेचा एकमेकांचा काहीही संबंध असणार नाही. दोन्ही स्पर्धा स्वतंत्र असतील. दोन्ही स्पर्धाचे प्रवेश व पारीतोषिके स्वतंत्र असतील. **या स्पर्धेचे ठळक वैशिष्ट्य असे की या प्रश्नोत्तरी स्पर्धेचे एकुण ४३ बक्षीसे व पहिले पारितोषिक १ लक्ष रुपये (सामायिक - दोन्ही गटामिळून) आहे.** दोन्ही स्पर्धाचे दोन-दोन वर्गगट करण्यात आलेले आहेत.

## अभिवादन प्रश्नोत्तरी स्पर्धा गट

**अभिवादन स्पर्धा अभ्यासक्रम** (पहिला वर्गगट – वर्ग 7 ते वर्ग 12 किंवा वय 18 वर्षापर्यंत) – (1) जातीभेद निर्मुलन (2) क्रांती प्रतिक्रांती (3) अस्पृश्य मुळचे कोण? (4) हिंदु कोड बिल (5) बुद्ध की कार्ल मार्क्स (6) बुद्ध आणि त्यांचा धम्म

**स्पर्धा प्रश्नोत्तरी अभ्यासक्रम** (दुसरा वर्गगट –पदविका–पदवी व पदव्युत्तर किंवा वय 25 वर्षापर्यंत) – (1) जातीभेद निर्मुलन (2) क्रांती प्रतिक्रांती (3) अस्पृश्य मुळचे कोण? (4) हिंदु कोड बिल (5) बुद्ध की कार्ल मार्क्स (6) बुद्ध आणि त्यांचा धम्म (7) पुणे करार.

उपरोक्त स्पर्धा ही वस्तुनिष्ठ 75% व सविस्तर 25% प्रश्नोत्तरी वा संपुर्णत: वस्तुनिष्ठ स्वरुपाची असल्यामुळे, पहिल्या वर्ग गटाचे सहा व दुसऱ्या वर्गगटाचे सात पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी ''सखोल'' वाचन करणे अपेक्षित आहे जेणेकरून यश संपादन करणे सुलभ होईल. डॉ. बाबासाहेबांचे अभिवादनार्थ ही परीक्षा दि. 6 डिसेंबर 2014 (शनिवार) रोजी आपआपल्या शाळा-महाविद्यालयामधून घेण्यात येईल व या स्पर्धेत विद्यार्थी/परीक्षार्थी यांचे व्यतिरिक्त शाळा-महाविद्यालयांना **ढाल** तसेच उत्कृष्ट कामगीरी बजावणाऱ्या शिक्षकांना **सन्मानचिन्ह-सन्मान पत्रासह** सन्मानित करण्यात येईल.

## - पारितोषीके -

**पहिला वर्गगट**

- प्रथम बक्षिस (युवक) - 25,000
- प्रथम बक्षिस (युवती) - 25,000
- द्वितीय बक्षिस - 15,000
- तृतीय बक्षिस- 10,000
- चवथे बक्षिस - 5,000
- प्रोत्साहनपर 21 बक्षिसे - 2,000 (प्रत्येकी)

**दुसरा वर्गगट**

- प्रथम बक्षिस (युवक) - 25,000
- प्रथम बक्षिस (युवती) - 25,000
- द्वितीय बक्षिस- 10,000
- तृतीय बक्षिस - 7,000
- चवथे बक्षिस - 5,000
- प्रोत्साहनपर 21 बक्षिसे - 2,000 (प्रत्येकी)

**टिप** दोन्ही गट मिळून व विभागातून प्रथम येणाऱ्या परंतु पहिला वर्ग गट किंवा दुसरा वर्ग गट मध्ये पारितोषिक प्राप्त न करणाऱ्या परीक्षार्थीस रु. 5000/- (प्रत्येकी) असे सहाही विभागांना ''विशेष बक्षीस''. (विभाग - नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे, कोकण (मुंबईसह).

## निबंध स्पर्धा गट

भारतीय संविधान या ग्रंथावर आधारीत सहा ते आठ पानांचा वा 2500 ते 3000 शब्दांचा महाविद्यालयीन गटाकरिता तसेच चार ते पाच पानांचा वा 1500 ते 2000 शब्दांचा (वर्ग गट - वर्ग 7 ते 12 करिता) निबंध लिहिणे. यामध्ये संविधान प्रास्ताविका, सर्व कलमे, लोकसभेतील चर्चा, मसुदा समितीमधील बाबासाहेबांचे योगदानाबाबत माहिती असणे अनिवार्य आहे. **निबंध स्पर्धा दि. 26 नोव्हें. 2014 (संविधान दिन)**

**पहिला वर्गगट**

- प्रथम बक्षिस - 5,000
- द्वितीय बक्षिस - 3,000
- तृतीय बक्षिस- 2,000
- चवथे बक्षिस - 1,500
- पाचवे बक्षीस -1,000

**दुसरा वर्गगट**

- प्रथम बक्षिस - 5,000
- द्वितीय बक्षिस - 3,000
- तृतीय बक्षिस- 2,000
- चवथे बक्षिस - 1,500
- पाचवे बक्षीस -1,000

मिडीया पार्टनर

महाराष्ट्र टाइम्स | BUDDHA | आवाज TV | दैनिक सकाळ | दैनिक सम्राट